**आर.सी.एस. १९६/२०२१**
**निशाणी २४ लगत**

**वादीचा साक्षीदार क्रमांक १ याचा पुढील उलटतपास प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञ ई. ए. पठाण यांच्या मार्फत शपथेवर सुरू –**

२. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ३०.०५.२००५ रोजीच्या खरेदीखतामध्ये १०१६/१ व १०१६/२ असा उल्लेख केला नाही. साक्षीदारास सदर खरेदीखताची प्रमाणीत प्रत दाखवण्यात आली. त्यावर लिहून घेणार म्हणुन वादी क्रमांक १ व २ यांची नावे असुन लिहून देणार म्हणुन प्रतिवादी अर्जुन म्हेत्रे याचे नाव आहे. खरेदीखताची प्रमाणित प्रत साक्षीदारास दाखवली. सदर खरेदीखतास **निशाणी क्रमांक ३७** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ३७ वरील खरेदीखतामध्ये नगरपरिषद मालमत्ता क्रमांक ७९४१ चा उल्लेख नाही.

प्रश्न – सदर खरेदीखतानुसार तुम्हाला नगरपरिषद मालमत्ता क्रमांक ७९४१ व गट क्रमांक १०१६/२ तुम्हाला खरेदी दिलेली नाही.

उत्तर – मला जागेची जास्त कल्पना नव्हती. त्यामुळे ग्रामपंचायतच्या उता–यावरुन मला खरेदी दिलेली आहे. त्यामध्ये जाणुन–बुजुन गट क्रमांक नमुद केलेले नाहीत.

३. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या खरेदीखतामध्ये मिळकत ७६७४ चा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला मालमत्ता क्रमांक ७९४१ चे खरेदीखत दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, नगरपरिषद मालमत्ता क्रमांक ७९४१ शी माझा व प्रतिवादीचा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, मालमत्ता क्रमांक ७९४१ अर्जुन म्हेत्रेने मला खरेदी दिल्याबाबत माझ्या तोंडी शब्दाव्यतिरीक्त माझ्याकडे कोणताही पुरावा नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, माझ्याकडे ७/१२ उतारा आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक १०१६ अर्जुन म्हेत्रेने मला दिल्याबाबत माझ्याकडे तोंडी शब्दाव्यतिरीक्त अन्य पुरावा नाही.

प्रश्न – गट क्रमांक १०१६ व मालमत्ता क्रमांक ७९४१ चे खरेदीखत अर्जुन म्हेत्रेने तुम्हाला दिल्याबाबत तुमच्याकडे तोंडी शब्दाव्यतिरीक्त इतर कोणताही पुरावा नाही.

उत्तर – जाणुन–बुजुन शडयंत्र रचुन ग्रामपंचायतच्या उता–यावर खरेदीखत द्यायचे आणि पुढे अडचणी निर्माण करायच्या असे यांचे धोरण आहे.

**आर.सी.एस. १९६/२०२१**
**निशाणी २४ लगत**

४. हे म्हणणे खरे आहे की, कायद्याचे व लिहिण्याचे ज्ञान आहे.

प्रश्न –२००५ पासुन आजपर्यंत प्रतिवादीने शडयंत्र रचल्याबाबत, फसवणुक केल्याबाबत तुम्ही कोणतीही कार्यवाही प्रतिवादी विरुध्द केलेली नाही.

उत्तर – २०२१ पासुन मी न्यायालयीन कार्यवाही केलेली आहे.

प्रश्न – तुम्हाला फसवणुक झाल्याचे कधी समजले.

उत्तर – खरेदीखतानंतर ४–५ वर्षांनंतर आम्हाला समजले.

५. हे म्हणणे खरे आहे की, मी त्यानंतर लागलीच कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी व वादी क्रमांक २ याने प्रतिवादी अर्जुन, दत्तात्रय म्हेत्रे, अनिता राऊत, चंद्रकांत म्हेत्रे, संजय राऊत व पुष्पा यादव यांच्या विरोधात या न्यायालयामध्ये दिवाणी दावा क्रमांक ३१५/२०१४ हा गट क्रमांक १०१६ चे मालक म्हणुन घोषित करणेकरीता दाखल केला होता. हे मला माहिती नाही की, सदरचा दावा दिनांक २०.०३.२०१९ रोजी न्यायालयाने खारीज केला.

*(न्यायालयाची वेळ समाप्त झाल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.)*

समक्ष,

**( यु. ए. भोसले )**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
**जामखेड**

दिनांक– १६/०३/२०२६
ठिकाण – जामखेड